पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रीय कार्यालय, भोसरी-**३९.**
जा.क्र.इक्षेका/**४**/कावि/११३३/२०१**७**
दि**नांक-** २४/**११** /२०१**७**

**प्रति,**

**मा.----------------------------**
सदस्य/सदस्या
इ प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
भोसरी-३९.

**विषय- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची मासिक सभा गुरुवार दिनांक ७/१२/२०१७ रोजी दुपारी २.०० वा. आयोजित केलेबाबत.**

**महोदय / महोदया,**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची मासिक सभा **गुरुवार दिनांक ७/१२/२०१७ रोजी दुपारी २.०० वाजता** इ क्षेत्रीय कार्यालयाचे **"संत ज्ञानेश्वर महाराज"** सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू,

**सही/-**
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
इ प्रभाग समिती

प्रत- १. सर्व संबंधित शाखाप्रमुख
२. कार्यालयीन नोटीस बोर्ड

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

**इ प्रभाग समिती**

**कार्यपत्रिका क्रमांक – ०५**

दिनांक- **०७/ १२/**२०**१७** रोजी वेळ- दुपारी **२.**०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची मासिक सभा **गुरूवार दिनांक ७/१२/**२०**१७ रोजी** दुपारी २.०० वाजता इ क्षेत्रीय कार्यालयातील **"संत ज्ञानेश्वर महाराज"** सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

अ) दिनांक ०२/११/२०१७ रोजीची रोजी झालेल्या सभेचा (कार्यक्रमपत्रिका **४**) सभावृत्तांत कायम करणे**.**

**विषयक्र. १**– इ क्षेत्रीय कार्यालयाकडील विद्युत विभागामध्ये सन २०१७-१८ चे अंदाजपत्रकाच्या तरतूदमध्ये अस्थायी आस्थापना या लेखाशिर्षावर र.रु. ३,००,०००/- इतकी तरतूद करण्यात आलेली आहे. इ क्षेत्रीय विभागात ५ (पाच) प्रशिक्षणार्थी वीजतंत्री व तारतंत्री या पदावर काम करीत आहेत. प्रशिक्षणार्थी यांचे विद्यावेतन हे माहे जुलै २०१७, ऑगस्ट २०१७, सप्टेंबर २०१७ या तीन महिन्याचे विद्यावेतन देणे बाकी आहे.

| अ.क्र. | लेखा शिर्षकाचे नांव | सन २०१७-१८ ची तरतूद | आवश्यक तरतूद वाढ करावयाची रक्कम | आवश्यक तरतूद घट करावयाची रक्कम | सुधारीत तरतूद सन २०१७ २०१८ |
|---|---|---|---|---|---|
| १ | अस्थायी अस्थापना | ३,००,०००/- | १,५०,०००/- | ० | ४,५०,०००/- |
| २ | स्थायी अस्थापना | ३,७८,००,०००/- | ० | १५००००/- | ३,७६५०,०००/- |

सबब सध्या अस्थायी अस्थापना या लेखाशिर्षावर असलेली र.रु.३,००,०००/- तरतूद कमी पडत असून येणारा प्रस्तावीत खर्च लक्षात घेता सन २०१७-१८ साठी सदरची तरतूद र.रु. १,५०,०००/- करण्यात यावी असे वाटते. त्यासाठी इ क्षेत्रीय विभागाच्या स्थायी अस्थापना लेखाशिर्षावर ३,७८,००,०००/- इतकी तरतूद आहे. सदर तरतूदीमधून एप्रिल २०१७ ते जुलै २०१७ अखेर झालेला खर्च २,४५,४१,६२९/- इतका आहे व उर्वरीत शिल्लक र.रु.१,३२,५८,३७१/- इतकी आहे. सबब स्थायी अस्थापना या लेखाशिर्षकावरुन र.रु.१,५०,०००/- इतकी तरतूद अस्थायी आस्थापना लेखा शिर्षकावर वर्ग करता येणे शक्य आहे. महाराष्ट्र अधिनियम १९४९ कलम १०३ अन्वये एका अर्थसंकल्पीय शिर्षकातून दुस-या अर्थसंकल्पीय शिर्षकामध्ये वर्ग करावयाच्या रक्कमा नियमानुसार वर्ग करता येत असल्याने सदरचा विषय मान्यतेकामी ठेवण्यात येत आहे.

**विषय क्र. २-** प्रभाग क्रमांक ७ भोसरी येथील स.न. १ मधील प्रेक्षक गॅलरीला कै. समाजभूषण वस्ताद सदाशिव रामभाऊ फुगे यांच नाव देणेकामी सदरचा विषय मा.प्रभाग समिती पुढे मा**न्य**तेकामी ठेवण्यात यावा.

मा.सभापती यांचे मान्यतेने ऐनवेळचे विषय घेणे.

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
इ क्षेत्रीय कार्यालय
भोसरी – ३९.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रीय कार्यालय, भोसरी-३९
जा.क्र.इक्षेका/**४**/कावि/**११३३**/२०१**७**
दि**नांक- २४/११** /२०१**७**